## स्थायी समिती
## दाखल विषय – दि. ११/२/२०२०

**विषय क्रमांक :– २१८९ त्वर्य**

बालवाडी पोषण आहार सध्या प्रति विद्यार्थी ६–०० रूपये या दराने असून सदर दर हा एका विद्यार्थी मागे आहे. सध्या सर्व मालाचे दर हे वाढलेले आहेत. उदा.तांदूळ ,डाळ, तेल इ. आहाराचे पंरतू हे सर्व लक्षात घेवून हा दर पूरेसा नाही. सदरच्या बालवाडी पोषण आहाराचे दर वाढवून तो दर सरासरी र.रु.२०(एक विद्यार्थी) प्रमाणे करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.सौ.निता अनंत दांगट यांचे दि.१०/२/२०२० चे पत्रावर झालेला मा.महिला बालकल्याण समिती ठराव क्र. ११८ दि.१०/२/२०२० विचारासाठी.

**विषय क्रमांक :– २१९० त्वर्य**

मा.सौ.मुक्ता टिळक, आमदार व मा.सौ.अनिता कदम यांचे दि.१०/२/२०२० चे पत्र.

प्रभाग क्र. ३० क मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९–२० चे अंदाजपत्रक, १०.ग.विद्युत विभाग, पान क्र. १००, अ.क्र. ४, शहरातील विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था करणे, (यादी क्र. एसबी–५), पान क्र.२१०, अ.क्र.१७०, प्रभाग क्र. १५ क मध्ये उद्यानात सौर उर्जेवरील दिवे बसविणे | २० लाख | --- |
| नवीन सुचविलेली कामे – | | |
| १) प्रभाग क्र. ३० क जनता वसाहत परिसरातील केबल अंडरग्राऊंड करणे | --- | १० लाख |
| २) प्रभाग क्र. ३० क जनता वसाहत परिसरातील जुने विद्युत पोल काढून नविन बसविणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक :– २१९१ त्वर्य**

मा.दिलिप बराटे व मा.सौ.लक्ष्मी दुधाने यांचे दि.११/२/२०२० चे पत्र.

प्रभाग क्र.३२ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. २ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अ.क्र. | अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १. | सन २०१९–२० चे अंदाजपत्रक, ७.आरोग्य विभाग, पान क्र. ९६, अ.क्र. १३, शहरामध्ये दवाखाने, प्रसुतिगृह बांधणे, दवाखान्यांसाठी विविध उपकरणे खरेदी करणे, दवाखान्यातील मुलभूत सोयी सुविधांसाठी विविध विकास कामे करणे, (यादी क्र. एसजे–६), पान क्र.२३३, अ.क्र.७१, प्रभाग क्र. ३२ अ मॅटर्निटी हॉस्पीटल येथील फर्निचर करणे | १ कोटी | --- |
| २. | पान क्र.२३३, अ.क्र.७२, प्रभाग क्र. ३२ अ मॅटर्निटी हॉस्पीटल करीता मेडिकल साहित्य खरेदी करणे | १ कोटी | --- |
| | नवीन सुचविलेली कामे | | |
| १. | प्रभाग क्र. ३२ अ शंकर मंदिराजवळ गल्ली बोळ कॉंक्रिटीकरण करणे. | --- | १५ लक्ष |
| २. | प्रभाग क्र. ३२ अ खान वस्ती येथे गल्ली बोळ कॉंक्रिटीकरण करणे. | --- | १० लक्ष |
| ३. | प्रभाग क्र. ३२ अ सिद्धार्थ चौक येथील गल्ली बोळ कॉंक्रिटीकरण करणे. | --- | १५ लक्ष |
| ४. | प्रभाग क्र. ३२ अ चौरे वस्ती ते शिवाजी चौक गल्ली बोळ कॉंक्रिटीकरण करणे. | --- | १५ लक्ष |
| ५. | प्रभाग क्र. ३२ अ सेवालाल वस्ती येथे गल्ली बोळ कॉंक्रिटीकरण करणे. | --- | १० लक्ष |
| ६. | प्रभाग क्र. ३२ अ जय भवानी मित्र मंडळ परिसर गल्ली बोळ कॉंक्रिटीकरण करणे. | --- | १० लक्ष |
| ७. | प्रभाग क्र. ३२ अ बापुजी बुवा चौक येथील गल्ली बोळ कॉंक्रिटीकरण करणे. | --- | १० लक्ष |
| ८. | प्रभाग क्र. ३२ अ वैद वस्ती येथील गल्ली बोळ कॉंक्रिटीकरण करणे. | --- | १० लक्ष |
| ९. | प्रभाग क्र. ३२ अ शरद जांभुळकर घर ते समाज मंदिर येथे गल्ली बोळ कॉंक्रिटीकरण करणे. | --- | १५ लक्ष |
| १०. | प्रभाग क्र. ३२ अ नाना गुंजाळ ते अचानक चौक येथे कॉंक्रिटीकरण करणे. | --- | १० लक्ष |
| ११. | प्रभाग क्र. ३२ अ गोसावी वस्ती ते रकसाळे यांचे दुकानापर्यंत गल्ली बोळ कॉंक्रिटीकरण करणे. | --- | १० लक्ष |
| १२. | प्रभाग क्र. ३२ अ शिवाजी चौक ते काकडे जागे पर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. | --- | १५ लक्ष |

| | | | |
|---|---|---|---|
| १३. | प्रभाग क्र. ३२ अ मध्ये कै.वनाबाई बराटे शाळा परिसर गल्ली बोळ काँक्रिटीकरण करणे. | --- | १० लक्ष |
| १४. | प्रभाग क्र. ३२ अ मध्ये त्रिमुर्ती सोसायटी रस्ता काँक्रिटीकरण करणे. | --- | १५ लक्ष |
| १५. | प्रभाग क्र. ३२ अ महादेव मंदिर,कॅनॉलरोड येथीलच गल्ली बोळ काँक्रिटीकरण करणे. | --- | १५ लक्ष |
| १६. | प्रभाग क्र. ३२ अ मध्ये वैदवस्ती येथील गल्ली बोळ काँक्रिटीकरण करणे. | --- | १५ लक्ष |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक :- २१९२ त्वर्य**

मा.सुनिल कांबळे, आमदार व मा.दिलिप वेडेपाटील यांचे दि.११/२/२०२० चे पत्र.

खालील सुचविलेली विकास कामे करणेसाठी र.रू. २ कोटींचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, १०.ख.वाहतूक नियंत्रण, पान क्र. १००, अ.क्र. २, शहरामधील चौकांची सुधारणा/विकास कामे करणे, वाहतुक सुधारण्यासाठी विविध विकास कामे करणे, (यादी क्र.टी-२), पान क्र.२००, अ.क्र.१, Electronic Bus (GCC Model) / विकत/ PPP इत्यादी धर्तीवर बस उपलब्ध करुन देणे (बजेट कोड नं. सीई२०B१०२/टी२-२१) | २ कोटी | --- |
| नवीन सुचविलेली कामे - | | |
| १) मा.महापौर चषक, स्पर्धा अंतर्गत विविध क्रिडा स्पर्धा तसेच कुस्ती स्पर्धा यासाठी भवन विभाग अंतर्गत मंडप, स्टेज, आसन व्यवस्था, खुर्च्या पुरविणे व तदनुषंगिक व्यवस्था करणे. | --- | १ कोटी |
| २) भवन विभागातील विविध कार्यक्रम, मंडप व्यवस्था व क्रिडा विभागाअंतर्गत विविध स्पर्धेचे आयोजन करणे. | --- | १ कोटी |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक :- २१९३ त्वर्य**

मा.विशाल धनवडे यांचे दि. ११/२/२०२० चे पत्र.

मा.स्थायी समिती ठराव क्र. २१११ दि. २७/१/२०२० (पुणे महानगरपालिकेच्या वतीने मनपाच्या सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांना, ज्या शुरवीरांनी छत्रपती श्री.शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या 'हिंदवी स्वराज्यासाठी' बलिदान केले, त्या शूरवीरांचा इतिहास विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचला पाहिजे म्हणून 'तान्हाजी' हा चित्रपट मोफत दाखविण्यास मान्यता मिळणेबाबत) चा फेरविचार करुन मा.सभासदांचा मुळ प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**विषय क्रमांक :- २१९४ त्वर्य**

मा.योगेश मुळीक यांचे दि.११/२/२०२० चे पत्र.

प्रभाग क्र.५ क मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. ३ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अ.क्र. | अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १ | सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १००, अ.क्र. ७, शहरामधील रस्ते विकसित करणे, (यादी क्र. एसए-६), पान क्र.१७४, अ.क्र.९४, पेपल सेमेनरी ते आदर्शनगर सैनिकवाडी रस्ता विकसित करणे व तदनुषंगिक कामे करणे. | ३ कोटी | |
| | **सुचविलेली कामे** | | |
| १ | सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १००, अ.क्र. ७, शहरामधील रस्ते विकसित करणे, (यादी क्र. एसए-६), पान क्र.१७४, अ.क्र.८२, रामवाडी पंपिंग स्टेशन ते सैनिकवाडी परिसरातील रस्ते विकसित करणे व तदनुषंगिक कामे करणे. (बजेट कोड नं. - सीई२०अे१२४८/एसए६-३८२) | - | ५० लाख |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | पान क्र.१७४, अ.क्र.९५, कल्याणीनगर भागातील रस्ते विकसित करणे व तद्नुषंगिक कामे करणे. (बजेट कोड नं. – सीई२०अे१२४८/एसए६–३९५) | – | ५० लाख |
| ३ | पान क्र.१७४, अ.क्र.८०, प्रभाग क्र. ५ क मध्ये वडगाव शेरी व परिसरातील रस्ते विकसित करणे. (बजेट कोड नं. – सीई२०अे१२४८/एसए६–३८०) | – | १ कोटी |
| ४ | पान क्र.१७४, अ.क्र.८१, प्रभाग क्र. ५ क मधील रस्ते विकसित करणे. (बजेट कोड नं. – सीई२०अे१२४८/एसए६–३८१) | – | १ कोटी |

**विषय क्रमांक :– २१९५ त्वर्य**

मा.योगेश मुळीक यांचे दि.११/२/२०२० चे पत्र.

मा.स्थायी समिती ठराव क्र. २१७१ दि. ४/२/२०२० (प्रभाग क्र.५ क मध्ये विविध विकास कामे करणेसाठी र.रू. ३ कोटीचे वर्गीकरण करण्याबाबत) चा फेरविचार करुन मा.सभासदांचा मुळ प्रस्ताव दप्तरी दाखल करण्यास मान्यता देण्यात यावी.

**विषय क्रमांक :– २१९६ त्वर्य**

माहिती व जनसंपर्क कार्यालयाकडील जाहिरात प्रकटन खर्चाची बिले आदा करणेसाठी र.रू. २.५० कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मावजसंका/१०६६ दि.१०/२/२०२० चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९–२० चे अंदाजपत्रक, मुख्य अभियंता (प्रकल्प) कार्यालय, CE20B102/T2-21 Electronic Bus (GCC Model/ विकत/PPP इत्यादी धर्तीवर बस उपलब्ध करुन देणे | २.५० कोटी | --- |
| नवीन सुचविलेले काम – | | |
| माहिती व जनसंपर्क कार्यालय, RE11M105, माहिती व जनसंपर्क कार्यालयाकडील जाहिरात प्रकटन खर्चाची बिले आदा करणेसाठी | --- | २.५० कोटी |

**विषय क्रमांक :– २१९७ त्वर्य**

पुणे महानगरपालिकेकडील आस्थापनेवरील कायम सेवक श्री.सुनिल नारायण साळवी सहाय्यक समाज विकास अधिकारी,समाजविकास विभाग हे पुणे मनपाकडे कार्यरत आहेत. त्यांची सेवा बदली पात्र नाही. तसेच त्यांच्या पत्नी सौ.सुवर्णा सुनिल साळवी(सुवर्णा बाबूराव वरगणे)या महाराष्ट्र शासनाच्या अप्पर आयुक्त आदीवासी विकास विभाग,ठाणे येथे पेण प्रकल्पात आदिवासी आश्रमशाळा साई या ठिकाणी स्त्री अधिक्षिका या कायम पदावर कार्यरत आहेत. सदर दांपत्यास १० वर्षाची मुलगी असून सध्या पुणे येथे शालेय शिक्षण चालू आहे. सदर अपत्याच्या संगोपनामध्ये कार्यालयीन कर्तव्याची ठिकाणे ही दूरवर व वेगवेगळी असल्याने अडचणी निर्माण झालेल्या आहेत. महाराष्ट्र शासनाचे प्रचलित पतीपत्नी एकत्रीकरणाचे धोरणानुसार श्री.साळवी यांच्या पत्नी सौ.सुवर्णा वरगणे यांना समाजविकास विभागाकडील रिक्त पदापैकी शासन अटी शर्तीमध्ये बसत असलेल्या पदावर सामावून घेण्यात यावे. सदर मनपा सेवक श्री.सुनिल साळवी यांच्या पत्नी सौ.सुवर्णा वरगणे (साळवी)यांनी पूर्वी समाजविकास विभागाकडे समूह संघटिका या पदावर काम केल्याचा अनुभव लक्षात घेता सदर महाराष्ट्र शासनाकडून त्यांना मनपाचे आस्थापनेवर सामावून घेण्यास मान्यता मिळणेबाबत मा.सौ.मनिषा लडकत व मा.सौ.स्वप्नाली सायकर यांचे दि.२२/१/२०२० चे पत्रावर झालेला महिला व बाल कल्याण समिती सभा ठराव क्र. १०४ दि. २४/१/२०२० विचारासाठी.

**विषय क्रमांक :– २१९८ त्वर्य**

पुणे महानगरपालिकेसाठी बॅकहो लोडर खरेदी करणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे. सिध्दार्थ ऑटो इंजिनिअर्स प्रा.लि. यांचे एकच टेंडर आले (पुर्वगणनपत्रक र.रु. ८२,५०,०००/– पेक्षा २.७२५% कमी) असल्याने त्यांचेकडून १ नग बॅकहो लोडर करीता र.रु. २६,७५,०६२=५० याप्रमाणे ३ नग बॅकहो लोडर करीता

र.रु. ८०,२५,१८७=५० जीएसटी व इ. सर्व खर्चासह खरेदी करणेस व त्याकामी त्यांचे बरोबर करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/१०५३ दि.५/२/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २१९९ त्वर्य**

वृक्षरोपण व अन्य कामासाठी जेसीबी खरेदी करणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे. सिध्दार्थ ऑटो इंजिनिअर्स प्रा.लि., यांचे एकच टेंडर आले (पुर्वगणनपत्रक र.रु. ५५,००,०००/– पेक्षा २.७२५% कमी) असल्याने त्यांचेकडून १ नग जेसीबी करीता र.रु. २६,७५,०६२.५० याप्रमाणे २ नग जेसीबी करीता र.रु. ५३,५०,१२५/– जीएसटी व इ. सर्व खर्चासह खरेदी करणेस व त्याकामी त्यांचे बरोबर करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/१०५४ दि.५/२/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २२०० त्वर्य**

पुणे मनपाच्या विविध क्षेत्रिय कार्यालयाच्या परिसरामधील घनकचरा निविदा क्र. १९२/२०१९–२० मधील नमुद स्पेसिफिकेशन असणाऱ्या वाहनांच्या सहाय्याने गोळा करुन वाहतुक करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. बालाजी अर्थ मुव्हर्स ॲण्ड लॅण्ड डेव्हलपर्स, पुणे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पुर्वगणनपत्रक र.रु. ७४,९९,६५४=५४ पेक्षा १७% कमी) असल्याने त्यांचेकडून सदरचे काम करुन घेण्यासाठी खालील बाबीस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/१०५५ दि.५/२/२०२० चे पत्र.

१) सदर कामी सर्वात कमी दर देणारे निविदाकार मे. बालाजी अर्थ मुव्हर्स ॲण्ड लॅण्ड डेव्हलपर्स, स.नं.७०, संतोष नगर, कात्रज–आंबेगाव रोड, कात्रज, पुणे – ४६ यांचेकडून त्यांचे टेंडरदराने (पुर्वगणनपत्रकापेक्षा १७% ने कमी) र.रु. ६२,२४,७१३=२६ पर्यंत टेंडर अटी शर्तीनुसार करणेस व त्याकामी त्यांचे बरोबर करारनामा करणेस .....

२) सदर कामी दि. ०६/०१/२०२० पासून विविध क्षेत्रिय कार्यालयाचे मागणीनुसार आवश्यकतेप्रमाणे भाडेतत्वावर वाहने घेण्यात येऊन कचरा वहातुकीचे काम सुरु करण्यात आलेले असल्याने मान्यता पुर्वी केलेल्या कामाची पश्च्यात मान्यता मिळणेस.

**विषय क्रमांक :– २२०१ त्वर्य**

आंबिल ओढ्यामधील संगम हॉल ते श्री.संत एकनाथ नगर दरम्यान अतिवृष्टीमुळे नादुरूस्त झालेल्या मुख्य मलवाहिन्यांची दुरूस्ते करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.अनिल भिमसेन कोनूरकर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ६६,२६,१७८=७० पेक्षा २२.३४०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ५१,४५,८९०=६१ व अधिक जी.एस.टी.र.रू. ६,१७,५०६=८७ एकूण र.रुपये ५७,६३,३९७=४८ पर्यंत होणाऱ्या एकूण रकमेपर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनि:सारण/१०५७ दि.०६/०२/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २२०२ त्वर्य**

आंबिल ओढ्यामधील रॉयल आर्केड ते के.के.मार्केट दरम्यान अतिवृष्टीमुळे नादुरूस्त झालेल्या मुख्य मलवाहिन्यांची दुरूस्ते करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.अनिल भिमसेन कोनूरकर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ६६,३७,११२=७० पेक्षा २२.३४०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ५१,५४,३८१=७२ व अधिक जी.एस.टी.र.रू. ६,१८,५२५=८१ एकूण र.रुपये ५७,७२,९०७=५३ पर्यंत होणाऱ्या एकूण रकमेपर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनि:सारण/१०५८ दि.०६/०२/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २२०३ त्वर्य**

नव्याने समाविष्ट झालेल्या धायरी गावातील आर.पी.रस्ते विकसीत करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.दिपक कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ८६,९४,२२९/– पेक्षा ३.३०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ८४,०७,३१९=४४ पर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी.र.रू. १०,४३,३०७=४८पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रू. २,४६,६३८=३० पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. १५,३८६/– पर्यंत अदा करणेस अधिक टेंडर अटी शर्तीनुसार डांबर, स्टील, सिमेंट या विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१०५९ दि.०६/०२/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २२०४ त्वर्य**

समाज विकास विभागामार्फत प्रशिक्षण घेतलेल्या महिलांकरिता विविध प्रभागात शिलाई मशिन खरेदी करणे कामी पोर्टल GeMद्वारे निविदा मागविल्या असता एकूण ४ निविदा आल्या असल्याने सर्वात कमी दर देणारे निविदाधारक मे. नमन एंटरप्रायझेस, पुणे यांचेकडून रक्कम रुपये ९२६००,९८,/- (सर्वकरांसह) पर्यंत काम करून घेणेस ,त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेसतसेच , सदर कामापोटी होणारे बिल अदा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/सविवि/१०६४ दि. १०/२/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २२०५ त्वर्य**

प्रभाग क्र. ७ ड मध्ये आकर्षक प्रकाश व्यवस्था करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एम.एस.इलेक्ट्रिकल्स् यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पुर्वगणनपत्रक र.रु.४२,२८,९८६/– पेक्षा ५.९२३४% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३९,७८,४८६=२४ अधिक पुगपमधील आयटेम क्र. ५ ते ९ चे र.रुपये १,८३,७६६/– वर १२% जी.एस.टी.र.रू.२०,७४५=७० म्हणजेच एकूण टेंडर र.रुपये ३९,९९,२३१=९४ जीएसटीसह पर्यंत काम करून घेणेस व त्यांच्याशी करारनामा करणेस आणि त्यांनी केलेल्या कामापोटी बिल अदा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/१०६५ दि.१०/०२/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २२०६ त्वर्य**

पुणे महानगरपालिकेच्या विविध शाळांमधील मुलांना शिक्षणाची आवड निर्माण करणे करीता आवश्यक प्रयोगशाळा,विज्ञान,गणित व इतर शैक्षणिक साहित्य खरेदी करणे कामी निविदा मागविली असता आलेल्या ३ निविदांपैकी सर्वात कमी दर देणारे निविदाधारक मे.ऑरनेट यांचेकडून र.रू. ७७,४२,२५१=७९ पर्यंत खरेदी करणेस, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस, तसेच सदर कामापोटी होणारे बिल अदा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/भांडार/१०६७ दि.१०/०२/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २२०७ त्वर्य**

प्रभाग क्र. २५ क व ड मधील विविध चौक सुशोभिकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.मंगलम एंटरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ३४,४८,८८९=६० पेक्षा ०.३३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३४,३७,५०८=२६ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी.र.रू. ४,१३,८६६=७५ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रू. १४,१३४=०० अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. १६,६४३/– पर्यंत विशेष भाववाढ सुत्रानुसार अदा करणेस/कपात करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१०६८ दि.११/०२/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २२०८ त्वर्य**

पुणे मनपाच्या विविध माध्यमिक शाळा व परिसरात सर्व्हेलंस यंत्रणा पुरविणे,बसविणे व कार्यान्वीत करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.आय सिक्युअर टेक्नॉलॉजीस इंडिया प्रा.लि.यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पुर्वगणनपत्रक र.रु.८१,९०,२००/– पेक्षा १% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.८१,०८,२९८/– अधिक जी.एस.टी.१८% र.रू.१४,५९,४९३=६४ असे एकूण र.रुपये ९५,६७,७९१=६४ पर्यंत डिफेक्ट लायबलिटी पिरीयड १ वर्ष अधिक ४ वर्ष असे एकूण ५ वर्ष मेटेनन्सचे काम करुन घेणेस व त्याप्रमाणे त्यांच्याशी करारनामा करणेस आणि त्यांनी केलेल्या कामापोटी बिल अदा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/१०६९ दि.११/०२/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २२०९ त्वर्य**

आंबिल ओढ्यामधील पद्मावती पुल ते विरंगुळा केंद्र दरम्यान अतिवृष्टीमुळे नादुरूस्त झालेल्या मुख्य मलवाहिन्यांची दुरूस्ती करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.देवकर एंटरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ३७,३३,४४७=८२ पेक्षा २५.०२% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. २७,९९,३३९=१७ व अधिक जी.एस.टी.र.रू.३,३५,९२०=०७ एकूण र.रुपये ३१,३५,२५९=८७ पर्यंत होणाऱ्या रकमेपर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनि:सारण/१०७० दि.११/०२/२०२० चे पत्र.

विषय क्रमांक :– २२१० त्वर्य

आंबिल ओढ्यातील साई वॉशिंग सेंटर ते वरखडेनगर कल्व्हर्ट दरम्यान अतिवृष्टीमुळे नादुरूस्त झालेल्या मुख्य मलवाहिन्यांची दुरूस्ती करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.संदिप एंटरप्रायजेस यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४३,११,२४५=८८ पेक्षा २१.२२०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३३,९६,३९९=६० व अधिक जी.एस.टी.र.रू.४,०७,५६७=९५ एकूण र.रुपये ३८,०३,९६७=५५ पर्यंत होणाऱ्या एकूण रकमेपर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनि:सारण/१०७१ दि.११/०२/२०२० चे पत्र.

विषय क्रमांक :– २२११ त्वर्य

पुणे महानगरपालिकेच्या विविध क्षेत्रीय कार्यालयांकडील मा.सभासदांच्या मागणीनुसार ८० लिटर प्लास्टिक बकेट पुरविणे कामी GeM Portal वर निविदा मागविण्यात आल्या असता आलेल्या १३ निविदांपैकी सर्वात कमी दर देणारे निविदाधारक मे. पायल इंडस्ट्रीजपुणे , **यांचेकडून** रक्कम रुपये - -/2,36,16,000**पर्यंत खरेदी करणेस**, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस व त्यापोटी त्यांचे **बिल अदा करणेस** मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/भांडार/१०७२ दि. ११/२/२०२० चे पत्र.

विषय क्रमांक :– २२१२ त्वर्य

पुणे महानगरपालिकेच्या विविध क्षेत्रीय कार्यालयांकडील मासभासदांच्या मागणीनुसार. बेंच पुरविणे कामी GeM Portal वर निविदा मागविण्यात आल्या असता आलेल्या १० निविदांपैकी सर्वात कमी दर देणारे निविदाधारक मे. पायल इंडस्ट्रीजपुणे , **यांचेकडून** रक्कम रुपये -/3,78,00,000 - **पर्यंत खरेदी करणेस**, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस व त्यापोटी त्यांचे बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/भांडार/१०७३ दि. ११/२/२०२० चे पत्र.

विषय क्रमांक :– २२१३ त्वर्य

पुणे महानगरपालिकेच्या विविध ठिकाणी असलेल्या गॅस शवदाहिनीसाठी वार्षिक पद्धतीने एल.पी.जी.गॅस सिलेंडर पुरविणे कामी खालील बाबीस मान्यता देण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/विद्युत/१०७४ दि.११/०२/२०२० चे पत्र.

१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसूची (ड) प्रकरण ५ मधील कलम (२)२ अन्वये पुणे महानगरपालिकेच्या विविध ठिकाणी असलेल्या गॅस शवदाहिनीसाठी वार्षिक पद्धतीने एल.पी.जी.गॅस सिलेंडर पुरविणे हे काम मे. श्री साई भारत गॅस बिबवेवाडी, पुणे व श्रीराम गॅस एजन्सी, सिंहगडरोड, पुणे यांचेकडून केंद्र सरकारच्या भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि. या उत्पादक कंपनीच्या बाजारभावा प्रमाणे दरमहा बदलत्या दराने र.रु. ९८ लाखापर्यंत अंदाजे ७९३२ नग अथवा उपलब्ध रकमेपर्यंत १९ किलो एल.पी.जी.गॅस सिलेंडर समप्रमाणात खरेदी करण्यास व त्यानुसार त्यांच्याशी करारनामा करण्यास आणि त्यांनी पुरविलेल्या एल.पी.जी.गॅस सिलेंडर पोटी बिल दरमहा बदलत्या बाजार भावानुसार आदा करण्यास

२) टेंडर क्र. ९८/१९-२० रद्द करण्यास व त्यांचे अनामत रक्कम परत करण्यास

३) टेंडर क्र. ११ थांबविण्यास व संबंधित ठेकेदारानी पुरविलेल्या गॅस सिलेंडरची बिले अदा करण्यास व त्यांची अनामत रक्कम परत करण्यास

४) भविष्यामध्ये केंद्र सरकारच्या दुसऱ्या कंपनीच्या अधिकृत विक्रेता यांनी पुरवठा करण्याची तयारी दर्शविली तर त्यांना सुध्दा कार्यादेश देण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना देण्यास.

(टिप :- भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि., हिंदुस्तान पेट्रोलियम कार्पोरेशन लि., इंडियन ऑईल इत्यादी कंपनी भारत सरकारच्या उत्पादक कंपन्या असून त्यांचे दर संपुर्ण भारतात एकच राहणार आहे. शिवाय वेळोवेळी सदर दर संकेत स्थळावर प्रसिध्द केले जात असल्याने व निविदा दरापेक्षा सदर दर खुप कमी असल्याने व पुणे महानगरपालिकेचे कोणतेही नुकसान होत नसल्याने टेंडर क्र. ९८/२०१९-२० रद्द करुन ५(२)(२) अन्वये एल.पी.जी. गॅस सिलेंडर खरेदी करणे योग्य राहिल.)

**विषय क्रमांक :– २२१४ त्वर्य**

लोकशाहीर आण्णाभाऊ साठे स्मारक बिबवेवाडी येथील ईमारतीमध्ये उर्वरित विद्युत विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.मोरेश्वर इलेक्ट्रीकल कॉर्पोरेशन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पुर्वगणनपत्रक र.रु.४०,८०,३३१/- पेक्षा १०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३६,७२,२९७=९० अधिक जी.एस.टी. १२% र.रू. ४,४०,६७५=७५ असे एकूण र.रुपये ४१,१२,९३७=६५ जीएसटीसह पर्यंत काम करून घेणेस व त्यांच्याशी करारनामा करणेस आणि त्यांनी केलेल्या कामापोटी बिल अदा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/१०७५ दि.११/०२/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २२१५ त्वर्य**

प्रभाग क्र. ११ क म्हातोबानगर येथे मोठ्या व्यासाच्या ड्रेनेज लाईन टाकणे व कॉंक्रीट करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.आकाश कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३४,१०,३९०=५० पेक्षा ९.६०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३०,८२,९९३=०१ पर्यंत अधिक जी.एस.टी.र.रू. ३,६९,९५९=१६ असे एकूण र.रुपये ३४,५२,९५२=१७ व विशेष भाववाढ सुत्रानुसार (स्टार रेट) येणारी फरकाची रक्कम देणेस अथवा कपात होणाऱ्या रक्कमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनि:सारण/१०७६ दि.११/०२/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २२१६ त्वर्य**

अंबिल ओढयामधील विरंगुळा केंद्र ते फुलपाखरु उद्यान दरम्यान अतिवृष्टीमुळे नादुरुस्त झालेल्या मुख्य मलवाहिन्यांची दुरूस्ती करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.देवकर एंटरप्रायजेस यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ६१,६४,९५४/- पेक्षा २५.०२% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४६,२२,४८२=५० व अधिक जी.एस.टी.र.रू.५,५४,६९७=९० एकूण र.रुपये ५१,७७,१८०=४० पर्यंत होणाऱ्या रकमेपर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनि:सारण/१०७७ दि.११/०२/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २२१७ त्वर्य**

प्रभाग क्र. ५ क मधील रस्ते विकसीत करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.श्री. योगेश कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.१,४०,९८,१७२=८२ पेक्षा १५.०७% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. १,१९,७३,५७८=१८ पर्यंत काम करून घेणेस, अधिक जी.एस.टी. र.रुपये १६,९१,७८०=७४ पर्यंत अधिक रॉयल्टी र.रुपये १,०९,१४२=७५ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये २८,१९४/- अधिक टेंडर अटी शर्तीतील डांबर, स्टील, सिमेंट या विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१०७८ दि.११/२/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २२१८ त्वर्य**

रामवाडी पंपिग स्टेशन ते सैनिकवाडी व परिसरातील रस्ता विकसित करणे व तद्नुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. गाजुल कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १,३२,५४,४६३=२० पेक्षा ६.१८% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,२४,३५,३३७=३७ पर्यंत काम करून घेणेस,अधिक जी.एस.टी. र.रुपये १५,९०,५३५=५८ पर्यंत अधिक रॉयल्टी र.रुपये १,१६,६०५=५० पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये २८,१९४/- पर्यंत अधिक टेंडर अटीशर्तीतील डांबर, स्टील, सिमेंट या विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१०७९ दि.११/२/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २२१९ त्वर्य**

कल्याणी नगर भागात रस्ते विकसित करणे व तद्नुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. श्री. योगेश कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ८८,३२,६४०/- पेक्षा १९.१२% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ७१,४३,८३९=२३ पर्यंत काम करून घेणेस,अधिक जी.एस.टी. र.रुपये १०,५९,९१६=८० पर्यंत अधिक रॉयल्टी र.रुपये २९,६८१=४० पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये ४१,११५/- पर्यंत अधिक टेंडर अटीशर्तीतील डांबर, स्टील, सिमेंट या विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१०८० दि.११/२/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २२२० त्वर्य**

प्रभाग क्र. १५ क मधील बुधवार पेठ, सदाशिव पेठ, नारायण पेठ, शनिवार पेठेत ड्रेनेज लाईन व पावसाळी चेंबर समपातळीत करणे/ देखभाल करणे, शुक्रवार पेठ व प्रभागात इतरत्र मोठया व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे या कामांतर्गत शनिवार वाडा कोपरा (शुभश्री इमारत) ते पटवर्धन चौका (फुटका बुरूज) पर्यंत बाजीराव रस्त्याने मोठया व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.देवकर ॲण्ड सन्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.८८,३०,७६५=३७ पेक्षा १३.०४% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७६,७९,२३३=५६ व अधिक जी.एस.टी. र.रुपये ९,२१,५०८=०२ एकुण र.रुपये ८६,००,७४१=५८ व विशेष भाववाढ सुत्रानुसार येणारी फरकाची रक्कम देणेस अथवा कपात होणाऱ्या एकूण रक्कमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनि:सारण/१०८१ दि.११/२/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २२२१ त्वर्य**

प्रभाग क्र. ४१ कोंढवा बु. येथे हेरिटेज पार्कचे काम करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.व्ही ॲन्ड व्ही असोसिएट्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४६,८१,१५१/– पेक्षा १५.३५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३९,६२,५९४=३२ उपलब्ध तरतुदी रकमेपर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ५,६१,७३८=१२ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग र.रुपये १३,५९८/– पर्यंत अधिक निविदा अटीशर्तीनुसार सिमेंट, स्टील या विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रांनुसार फरक अदा/कपात करणेस व त्यापोटी त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/१०८२ दि.११/२/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २२२२ त्वर्य**

पुणे शहरातील वाहतूक नियंत्रण बेटे व पुलावर विविध कामे करणे व सूचनात्मक फलक बसविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.रक्षा एन्टरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ६४,२८,३९६/– (जी.एस.टी.वगळून) पेक्षा १६.१०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ५३,९३,४२४=२४४ पर्यंत काम करुन घेणेस अधिक जी.एस.टी.र.रू. ७,७१,४०७=५२ पर्यंत अदा करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस अधिक टेंडर अटी शर्तीनुसार विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा/कपात करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/प्रकल्प/१०८३ दि.११/०२/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २२२३ त्वर्य**

प्रभाग क्र. ३८ ब चिंतामणराव देशमुख प्रशालेमागील गार्डन विकसीत करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.शुभविजय कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २६,२८,९२२=७२ पेक्षा ९.८९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. २३,६८,९२२=२६ पर्यंत काम करुन घेणेस व त्यानुसारचा जी.एस.टी.र.रू. २,८४,२७०=६७१ व रॉयल्टी चार्जेस र.रू. ४९,४१९=५३ अधिक टेस्टिंग चार्जेस र.रू.६,०९०/– पर्यंत तसेच अटी शर्तीतील विशेष भाववाढ सुत्रानुसार दरात होणारी वाढ/घट त्यानुसार येणारी रक्कम ठेकेदारास आदा/वसूल करणेस यांस अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/उद्यान/१०८४ दि.११/०२/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २२२४ त्वर्य**

प्रभाग क्र. ३० ड जनता वसाहत दत्तवाडी पु.ल.देशपांडे उद्यान सिंहगड रोड येथील जलतरण तलाव सुशोभिकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.पृथ्वी कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२९,४३,४९५=३५ पेक्षा २.१६% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२८,७९,९१५=८५ पर्यंत काम करुन घेणेस अधिक जी.एस.टी.र.रू.३,५३,२१९=४४ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू.२४,५५८/– पर्यंत अधिक अटी शर्तीनुसार सिमेंट, स्टील या विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/१०८५ दि.११/२/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २२२५ त्वर्य**

पुणे महानगरपालिकेतील कंत्राटी कामगारांच्या किमान वेतनदराप्रमाणे आरसीएच अंतर्गत सेवकांचे माहे सप्टेंबर २०१९ ते फेब्रुवारी २०२० पर्यंतचे वेतन अदा करणेकरिता र.रु. ८०,००,०००/– चे खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१०८७ दि.११/२/२०२० चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, आरोग्य कार्यालयपुणे महानगरपालिका, शहरी आरोग्य अभियान अंतर्गत (NUHM) कंत्राटी सेवकांच्या पगारापोटी RE17E101A | ८०,००,०००/- | ---- |
| सुचवलेले काम<br>आरोग्य कार्यालय पुणे महानगरपालिका, ब.असांसर्गिक (प्रमोटीव्ह) प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम कंत्राटी सेवकांच्या पगारासाठी मनपा हिस्सा RE17E101 | ---- | ८०,००,०००/- |

**विषय क्रमांक :– २२२६ त्वर्य**

प्रभाग क्र. ४० क स.नं.४३ मध्ये चिल्ड्रेन प्ले-ग्राऊंड विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.अदित्य एन्टरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३७,१०,४३८=१८० पेक्षा ०.३००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३६,९९,३०६=८६ उपलब्ध तरतुदी रकमेपर्यंत काम करुन घेणेस अधिक जी.एस.टी.र.रू.४,४५,२५२=५८ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रू. ३५,३३५/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग र.रू.३२,६०३/- पर्यंत अधिक निविदा अटी शर्तीनुसार सिमेंट, स्टील या विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रांनुसार फरक अदा/कपात करणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/१०८८ दि.११/२/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २२२७ त्वर्य**

प्रभाग क्र. ४० क मध्ये जेष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.ब्रम्हा कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३९,६७,८७५=५५ पेक्षा २.२५०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३८,७८,५९८=३५ उपलब्ध तरतुदी रकमेपर्यंत काम करुन घेणेस अधिक जी.एस.टी.र.रू.४,७६,१४५=०७ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रू. १५,२६४=७२ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग र.रू.४०,४२५/- पर्यंत अधिक निविदा अटी शर्तीनुसार सिमेंट, स्टील या विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रांनुसार फरक अदा/कपात करणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/१०८९ दि.११/२/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २२२८ त्वर्य**

मा.सौ.अश्विनी कदम यांचे दि.११/२/२०२० चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या कै.शिवशंकर पोटे दवाखाना येथे पुणे मनपा व खाजगी वैद्यकिय संस्था यांच्या संयुक्त विद्यमानाने पीपीपी तत्वावर अत्याधुनिक रेडिओलॉजिकल डायग्नोस्टिक सुविधा गेल्या दीड वर्षापासून यशस्वीरित्या सुरु आहे. सदर रेडिओलॉजिकल डायग्नोस्टिक सेंटर येथे एमआरआय, डिजीटल एक्सरे, सोनोग्राफी, २ डी ईको या सुविधा शासकीय दरापेक्षा ८% कमी दराने पुरविण्यात येत आहेत. सदरच्या सुविधांचे दर खाजगी रुग्णालयांमध्ये खुप जास्त प्रमाणात असून सर्व सामान्य रुग्णांच्या आवाक्याबाहेरचे असतात. सदर प्रकल्पाअंतर्गत आजपर्यंत सुमारे १२००० हून अधिक नागरिकांनी सदर सुविधेचा लाभ घेतलेला आहे. सदर प्रकल्पाचा पुणे मनपाबरोबर झालेल्या करारानुसार तेथील वीज बिलाची देयके भरण्याची जबाबदारी सदर प्रकल्प चालविणाऱ्या संस्थेंची आहे. वास्तविक पाहता अशा स्वरुपाचा लोकाभिमुख प्रकल्प चालविणारी पुणे महानगरपालिका ही देशातील पहिली महानगरपालिका आहे. सदर अत्याधुनिक रेडिओलॉजिकल डायग्नोस्टिक सुविधा शासकीय दरापेक्षा कमी दराने पुरविणे अत्यंत जिकरीचे आहे व त्याउपर तेथील वीज देयके चालविणाऱ्या संस्थेनेच भरणे आर्थिक दृष्ट्या सदर संस्थेला अडचणीचे होत आहे. अशा स्वरुपाची अत्याधुनिक रेडिओलॉजिकल डायग्नोस्टिक सुविधा शासकीय दरापेक्षा कमी दराने पुरविणेकामी तेथील वीज देयके पुणे महानगरपालिकेमार्फत भरल्यास सदरची सुविधा अधिक सक्षमरित्या पुरविणे शक्य होईल. पुणे मनपाच्या कमला नेहरु रुग्णालय येथील अशा स्वरुपाचा डायलेसिस प्रकल्प कार्यरत असून तेथील वीज देयके पुणे महानगरपालिकेमार्फत भरण्यात येत आहे याच धर्तीवर पुणे महानगरपालिकेच्या कै.शिवशंकर पोटे दवाखाना येथे रेडिओलॉजिकल डायग्नोस्टिक सुविधा शासकीय दरापेक्षा कमी दराने पुरविणाऱ्या प्रकल्पाचे वीज देयके पुणे मनपाने भरल्यास सदर प्रकल्प सक्षमरित्या चालविता येईल व अधिका अधिक नागरिकांना सदर सुविधा अत्यंत माफक दरात दिर्घकाळ उपलब्ध करुन देता येईल.

सुनिल पारखी
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.